# बातमीपत्र
## पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर
## माहिती कक्ष, दि. २० ऑक्टोबर २०२२

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६१७/२०२२ भादंविसक ३२४,३२३,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/१०/२०२२ रोजी ००.३० वा. गवंडी गल्ली झेंडा कट्टा सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/१०/२०२२ रोजी ०५.४२ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राहुल प्रभाकर भुमकर,वय-२७ वर्षे, रा- ६७४,उत्तर कसबा मल्लिकार्जुन मंदिर शेजारी गंवडी गल्ली,सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अभिषेक जाधव,रा- कैकाडी गल्ली,सोलापूर, २) त्याचा मित्र नाव पत्ता माहित नाही. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी व त्यांचा मित्र ऋषीकेश कनेकर असे गप्पा मारत उभे असताना फिर्यादीच्या ओळखीचा आरोपी मजकूर हा व त्याचा मित्र मिळून फिर्यादीस तु आम्हाला रागाने काय बघतो बे असे म्हणून शिवीगाळ करून हाताने मारहाण करून आरोपी मजकूर यांने रोडचे कडेला पडलेला दगड त्याचे एका हातात घेवून फिर्यादीच्या डोक्यात मारले.म्हणून. तपासः- पोना/१४२१/मुलाणी |

### फौजदार चावडी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६१९/२०२२ भादंविसक ४९८(अ),३७७,४९४,५०४,३४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २७/०५/२०२२ ते दि २८/१०/२०२० पर्यत जय मल्हार चौक बाळे,ता.उत्तर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/१०/२०२२ रोजी १९.४६ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | तबस्सुम नजीर सय्यद,रा-खेडपाटी ता.उत्तर सोलापूर जि.सोलापूर सध्या बेडर गल्ली वैराग ता.बार्शी जि सोलापूर. |
| **आरोपीचे नाव** | : | १) नजीर हुशेन सय्यद (पती), २) रबाबी सय्यद (सासू), ३) हुसेन सय्यद (सासरे), ४) ईलाही सय्यद (दीर) सर्व रा-खेडपाटी- |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील आरोपीत मजकूर यांनी फिर्यादीस माहेरून हुंडयाचे पैसे व दागिने आणले नाहीस म्हणून पैसे व दागिने आणण्यासाठी मानसिक व शारीरीक छळ करून मारहाण केली आहे.आरोपी क्र १ यांने फिर्यादीशी अनैसर्गिक संभोग केला आहे. व माहिला नामे करीश्मा मुबारक मुल्ला रा.निबंर्गी,ता-चडचण जि.विजापूर हिच्यांशी फिर्यादीच्या पती ने दुसरे लग्न केले आहे .म्हणून. तपासः- १३८५/कसबे-८८३०३८३२३६ |

### एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८१/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १६/१०/२०२२ रोजी १९.२० वा. न्यु गणेश हेअर कटिंग सलून समोर विजय नगर सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/१०/२०२२ रोजी १४.५५ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | राजु लक्ष्मण शिवरात्री,वय-२६ वर्षे,रा- ४२/२दत्तनगर गिरी झोपडपट्टी, लालबावटा ऑफिस शेजारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | २५,०००/- रू ची लाल करडया रंगाची स्पेल्डर आय स्मार्ट मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ सीएम १५०८ ही वरील ठिकाणी पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपासः- पोना/२७३/गायकवाड- |

## सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ८२१/२०२२ भादंविसक ३७९ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १५/१०/२०२२ रोजी २२.०० वा ते दि १६/१०/२०२२ रोजी ०८.०० वा. फिर्यादीचे राहते घरासमोरून सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/१०/२०२२ रोजी १९.१९ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | कुलदीप बाळासाहेब लामकाने,वय- ३२ वर्षे,रा- ११,श्रध्दा विहार अपार्टमेंट १०८,मोदीखाना यतिराज हॉटेल शेजारी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ३५,०००/- रू ची काळया रंगाची होन्डा युनिकॉर्न मो.सायकल |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादीच्या ताब्यातील मो.सायकल क्र एमएच १३ बीपी ९११८ ही वरील ठिकाणी पार्क करून ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीच्या संमतीवाचून वरील वर्णनाची व किंमतीची मो.सायकल ही मुद्दाम लबाडीने चोरून नेली आहे.म्हणून. तपास:- पोना/१३७४/सरतापे- ९८२३४३१३७४ |

## एमआयडीसी पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८२/२०२२ भादंविसक ३८०,४५७,४५४ प्रमाणे. |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/१०/२०२२ रोजी १९.३० वा ते दि १९/१०/२०२२ रोजी ०६.०० वा चे दरम्यान फिर्यादीचे राहते घरी,सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/१०/२०२२ रोजी २१.१७ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सविता बाळु माळवदकर,वय-३४ वर्षे,रा- १२२,अंबिका नगर,भाग-२,नई जिंदगी सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | अज्ञात चोरटा |
| **गेला माल** | | ९७,०००/- रू त्यात ०१ तोळे सोन्याचे नेकलेस,०१ तोळा सोन्याचे दोन जोडी सरपाळया,अर्धा तोळे सोन्याचे गंठण,पाऊण तोळेचे सोन्याचे जिरामणी,०१ ग्रॅम सोन्याचे मणीमंगळसूत्र,१५ ग्रॅमचे चांदीचे पैजण. |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी, यातील फिर्यादी हे त्यांचे माहेरी उमानगरी येथे देवकार्य असल्याकारणाने गेले असता जाताना घराला लॉक लावून गेले होते.तेव्हा कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे राहते घरातील किचनच्या दरवाजा कशाने तरी तोडून घरात प्रवेश करून किचनमध्ये असलेल्या लोखंडी कपाटाचे लॉक कशाने तरी तोडून लॉकरमध्ये ठेवलेले फिर्यादीचे नमुद वर्णनाचे व किंमतीचे सोने व चांदीचे दागिने इत्यादी चीजवस्तू फिर्यादीच्या संमतीवाचून मुद्दाम लबाडीने चोरुन नेले आहे.म्हणून. तपास:- पोह/१२७/पाटील-९३५६६३६३४८ |